महाराष्ट्र पोलीस

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
## हिंजवडी पोलीस स्टेशनच्या कारवाईची प्रेसनोट

**कोटयावधी रूपयांच्या कर्जातुन मुक्तता मिळावी यासाठी सिनेस्टाईल कट रचुन बेरोजगार इसमाचा खुन करून मयत इसम हा आपणच आहोत असे भासविण्याचा प्रयत्नात असलेला आरोपी पोलीसांकडुन जेरबंद**

हिंजवडी पोलीस स्टेशनच्या हददीत दि.२९/११/२०२० रोजी सकाळी ११/०० वाजण्याच्या पुर्वी सर्व्हे नं ९९/१ उदनशाहवली दर्ग्याचे मोकळया जागेत बंगलोर मुंबई हायवे रोडच्या बाजुला बाणेर पुणे या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने ,अज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने अज्ञात इसमास ,भोकसुन जीवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने मयत बॉडी उदनशाहवली दर्गा बाणेर येथे कंपाउडचे व होर्डीगचे मध्ये आडोशाला टाकुन त्यावर ज्वलनशील पदार्थ ओतुन मयत बॉडी पेटवुन दिल्याची माहीती प्राप्त झाल्याने घटनास्थळ तात्काळ जावुन पाहणी करून मयत अज्ञात इसमाबाबत शोध घेण्यास सुरूवात केली सदर गुन्हयातील मयत इसम याच्याबाबत कोणतीही माहीती नसताना त्याची अर्धनग्न जळीत बॉडीची,घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून घटनास्थळावर मिळुन आलेल्या मयत इसमाच्या खिशामध्ये मिळुन आलेल्या अर्धवट जळालेल्या चिठ्ठीतील हस्ताक्षरावरून मयत इसमाचे नाव पत्ता निष्पन्न करून त्यांची माहीती संकलित केली असता मयत इसमाचे नाव संदीप पुंडलिक माईनकर रा.घर नं १३६२ बिल्डींग नं २०६ म्हाडा सोसायटी संत तुकाराम नगर पिंपरी पुणे असे असल्याचे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न केले असुन सदरबाबत हिंजवडी पो स्टे येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

प्राथमिक तपासामध्ये मयत इसम याच्याबददल माहीती संकलित केली असता सदरचा इसमास दारूचे व्यसन असुन तो कोठेही फिरतो,कोठेही खातो व कोठेही राहत असल्याची माहीती मयताचे नातेवाईकाकडुन व शेजा-याकडुन समजली होती.मयत इसमास कोणत्या कारणांवर मारले याबाबतची माहीती मिळत नसल्याने तपास अंत्यत क्लिष्ट होत चालला होता परंतु पोलीसांनी चिकाटी दाखवित अहोरात्र परिश्रम करीत तांत्रिक तपासाच्या आधारे तपास करीत असताना मयत इसम हा वल्लभनगर एस टी स्टॅड येथील "शिवभोजन थाळी" येथे दररोज जेवण करीत असल्याची माहीती निष्पन्न झाल्याने सदर ठिकाणी पोलीसांनी तपास केला असता शिवभोजन थाळी येथे जेवण करणेसाठी येणा-या गि-हाईकांचे फोटो घेण्याची दुर्मिळ परंतु आधुनिक पध्दत असल्याचे निर्दशनास आले ,त्यामार्फतीने सदर ठिकाणी तपास केला असता दि. २३/११/२०२० रोजी दुपारी १२/४५ वाजण्याच्या मयत इसमाने शिवभोजन थाळी येथे जेवण केल्याचे निष्पन्न झाले.

पोलीसांनी ,घटनास्थळावर मिळुन ब्लू टूथच्या व तांत्रिक बाबीच्या आधारे तपास करून पि. चि. आयुक्तालयातील पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या मनुष्य मिसिंगबाबत माहीती घेवुन त्यातुन संशयित वाटणा-या मिसिंगमधील व्यक्तीचे वर्णन,त्याच्याकडील वस्तुच्या आधारे मिसिंग मेहबुब दस्तगीर शेख रा.फ्लॅट नं.बी-१३ साईश्रध्दा कॉलनी राजवाडेनगर काळेवाडी पुणे हा संशयितरित्या मिसिंग झाल्याचे दिसुन आला ,हाच धागा पकडुन पुढे तपास केला असता महेबुब शेख हा कर्जबाजारी झालेला असुन त्याच्यावर कोटयावधी रूपयांचे कर्ज असल्याची व त्यास दोन बायका असल्याची माहीती तपासात निष्पन्न झाली.त्याच्याबाबत तात्रिक बाबीच्या आधारे तपास केला असता तो दिल्ली येथे असल्याची माहीती मिळाल्याने हिंजवडी पोलीस स्टेशनकडील पथक मा.पोलीस आयुक्तांच्या आदेशावरून दिल्ली येथे रवाना केले,सदर पथकाने त्याचा दिल्ली येथे शोध घेतला असता तो मिळुन आली नाही.त्यामुळे दिल्ली रेल्वे स्टेशन येथे पुण्याहुन आलेले व पुण्याला जाणारे प्रवाश्यांची यादी चेक केली असता सदरचा इसम हा त्याच्या दुस-या बायकोसोबत पुण्याला रवाना झाल्याचे तपासात निष्पन्न झाले,त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांच्या सुचनेप्रमाणे हिंजवडी पोलीस स्टेशनकडील व ,युनिट – ४ अंमलदार याचे पथक तयार करून दौंड रेल्वे स्टेशन येथे जावुन आरोपी असलेल्या संपुर्ण रेल्वेतील प्रवासांची पाहणी केली असता सदरचा आरोपी हा मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याने निर्दयीपणे केलेल्या खुनाचा तपास केला असता आरोपी याने " त्याच्यावर कोटयावधी रूपयांचे कर्ज झाल्याने देणेदारांचा ससेमिरा चुकविण्यासाठी संदीप माईनकर याचा खुन करून ती बॉडी जाळुन नष्ट त्याच्याबाबतचा पुरावा नष्ट करून बॉडी ही त्याची स्वतचीच असल्याचा देखावा सर्वासमोर करणार असल्याचे आरोपीकडे केलेल्या तपासात निष्पन्न झालेले आहे. हया कटामध्ये आणखी कोण कोण सहभागी आहेत याबाबतचा तपास सुरू असुन आरोपी यास अटक करण्यात आलेली आहे.सदर आरोपी यास ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडे शंभर रूपयांच्या स्टॅपपेपरवर "मी कर्जबाजारी झालेलो असुन मी माझा शेवट करीत आहे,माझी बॉडी ही बाणेर भागातच मिळेल" असा म।।र लिहलेला स्टॅपपेपर आढळलेला असुन त्याबाबत अधिक तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस आयुक्त मा.कृष्णप्रकाश सो,अपर पोलीस आयुक्त मा.रामनाथ पोकळे सो,पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.सुधीर हिरेमठ,परिमंडळ दोनचे पोलीस उप-आयुक्त मा.आनंद भोईटे सो, गुन्हे शाखेचे सहा.पोलीस आयुक्त श्री आर आर पाटील,वाकड विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री गणेश बिरादार सो,यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत,पो.निरी अजय जोगदंड ,सपोनिरी उध्दव खाडे ,तपासपथकाचे सहा.पोलीस निरीक्षक सागर काटे,पोलीस अंमलदार बंडू मारणे, किरण पवार, महेश वायबसे,आतिक शेख,हनुमंत कुंभार,कुणाल शिंदे, गणेश शिंदे, बिजय घाडगे, रितेश कोळी,चंद्रकात गडदे,कारभारी पालवे,श्रीकांत चव्हाण,अमर राणे,सुभाष गुरव,दत्तात्रय शिंदे,झनक गुमलाडु, व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.प्रसाद गोकुळ, सपोनिरी अमरिश देशमुख ,पोलीस अंमलदार आजीनाथ ओबासे,गोविंद चव्हाण,मोहम्मंद नदाफ,प्रविण दळे (युनिट - ४) यांच्या पथकाने केलेली असुन तांत्रिक बाबीचे काम हे पोलीस अंमलदार सुभाष गुरव ,प्रशांत सईद, शंकर चिचंकर व माळी यांनी केलेले आहे.



सद्रक्षणाय खलनिग्रहणाय